International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.5 May– June 2023

# 'जीणं आमुचं' या आत्मकथनातील शैक्षणिक दृष्टिकोन

**पिराजी प्रल्हाद वाघमारे**
संशोधक, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**Corresponding Author- पिराजी प्रल्हाद वाघमारे**
**Email-** pw2011@rediffmail.com
**DOI- 10.5281/zenodo.8119959**

**प्रस्तावना :**

प्राचीन काळामध्ये हिंदू धर्मामध्ये वर्णव्यावस्था होती. त्यामूळे समाजात उच्च व निच हा भेद केला जात होता. वंशपरंपरागत व्यवसाय करावा लागत. वर्ण व्यवस्थेनुसार वर्तन करत असत. समाजात शुद्रांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागत. त्यामध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक देत असत. पुरूषसत्ताक कुटूंब पद्धतीमध्ये स्त्रीकडे पाहण्याचे दृष्टीकोन दोन होते. पहिला दृष्टीकोन शारीरिणी, पापी व हडळ आणि दुसरा माता, देवता, शक्ती, तारक असे दृष्टीकोन होते. दलित स्त्रियांना तर अतिशय वाईट प्रकारची वागणूक दिली जात असत.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याच्या अगोदर म्हणजेच "1920 च्या कालखंडामध्ये दलित समाजातील काही मंडळी आपल्या लेखनीद्वारे त्या वेळच्या सरकारला अस्पृश्य समाजाच्या दारूण अवस्थेची जाणीव करून देत होते. हिंदू धर्मातील दुष्ट चालीरितीवर, मनुस्मृतीवर ते आपल्या लेखनीद्वारे हल्ला चढवत होते. गोपाळ बाबा वलंगकर, पंडीत कोडींराम व किसन फागो बनसोडे ही मंडळी लेखन करणाऱ्यामध्ये प्रमुख होती. तर पुढे दलित मनाची व काही प्रमाणात साहित्याची जडण घडण होताना दिसते."[1]

परिवर्तन ही काळाची गरज असते त्याप्रमाणे मराठी साहित्यात अमुलाग्र बदल झाले. तत्कालीन राजसत्ता व धर्म संस्था याचा साहित्यावर परिणाम झालेला दिसतो. ब्रिटिशाच्या काळात शैक्षणिक विचार समाज सुधारकांच्या माध्यमातून सर्व सामान्यापर्यत पोहचू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य व तत्वज्ञान यामुळे दलित समाजात जागृती आली. दलित समाजातील स्त्री-पुरुष आपल्या मनातील विचार कथा, कविता, कादंबरी व आत्मकथन या साहित्याच्या माध्यमातून लिहू लागले. दलित लेखक मनातील चिड, विद्रोह, वेदना, नकार, संताप साहित्यात आला. दलित साहित्यात सर्व समाजातील अन्याय अत्याचार, विषमता हे विषय व्यक्त होऊ लागले.

"दलित साहित्य हा एक मराठी साहित्यातला स्वतंत्र वाङमयीन प्रवाह आहे. 1960 नंतर दलित साहित्याने आपली 'Indendtity' सिद्ध केली आहे. युगानयुगे दडपल्या गेलेल्या हुंकाराने प्रथमच इतके विद्रोही स्वरूप धारण केले. प्रस्थापीत समाजव्यावस्थेने ज्याचे जीवन पशुपातळीवर आणले होते. त्याच्या परंपरा, प्रथा, वाङ्मीन, सामाजिक आणि धार्मिक प्रमाणे दलितांनी नाकारली. नवी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि करुणा ही जीवनमूल्ये स्वीकारून मानव मुक्तीचे गीत गात, बौद्ध – फुले –आंबेडकर व इतर समाज सुधारक याच्या प्रेरणा घेत दलित साहित्याचा जन्म झाला."[2]

दलित साहित्यामध्ये दलित सामाजिक जाणीवेतून लेखन करू लागले. त्यामध्ये कविता, कथा, नाटक, कादंबरी व आत्मकथन या वाङ्मप्रकाराचा आधार घेत, तो आपले जीवनमुल्य शब्दबद्ध करू लागला. यामधील नायक-नायिकाचे, अनुभवविश्व, घटना, आशय, प्रसंग अभिव्यक्ती सर्व वेगळे होते. अन्याय-अत्याचाराविरूद्ध पेटून उठणारा, जातीयतेला कडाडून विरोध करणारा, खूळचट रूढी परंपरांना नकार देणारा, अशा संघर्ष करणाऱ्या पुरुष व स्त्रियांचे दर्शन दलित साहित्यात येऊ लागले. आज दलित साहित्याच्या रूपाने मराठी साहित्यात प्रतिभावंत लेखकांची पिढी निर्माण होऊ लागली.

"दलित साहित्याने मराठी साहित्यात आपले वेगळे भावश्विश्व निर्माण केले आहे. स्वत:च्या वेदनेची वेगळीच

लकब या चळवळीतल्या साहित्याने निर्माण केली. वेदना आणि विद्रोहाचं अजब रसायन तर त्यात होतेच; पण बुद्धची अपार महाकरुणाही होती. दलित कविता आणि आत्मकथनात स्त्रियांनी विचारांचा, दलित चळवळीचा बाज सतत तेवत ठेवला. 1978 सालापासून दलित आत्मकथनांनी मराठी साहित्य विश्वात लक्षणीय वेगळेपण निर्माण केले. दया पवारांच 'बलुतं', प्र,ई, सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी', शंकरराव खरातांचे 'तराळ-अंतराळ', लक्ष्मण माने याचे 'उपरा' आणि लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' ही आत्मकथने आहेत. यामधील अत्यंत भयाण वास्तवाने मराठी भावविश्वत चांगलीच खळबळ माजवली, 1980 साली बेबीताई कांबळे यांनी 'जीणं आमुचं' हे आत्मकथन प्रकाशित झालं आणि खऱ्या अर्थाने दलित स्त्रीच्या वेदना शब्दबद्ध होऊ लागल्या.

**शैक्षणिक दृष्टीकोन :**

बेबी कांबळे यांनी 'जीणं आमुचं' या आत्मकथनात वासत्ववादी चित्रण आले आहे. विविध घटना व प्रसंगाच्या माध्यमातून समाजदर्शन आले आहे. निच चालीरितीने, दलित माणसांची होणारी पिळवणूक, अंधश्रध्देतून पसरत असलेला देवभोळेपणा या आत्मकथनात आला आहे. यामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक. धार्मीक, सयुक्त कुटूंब व विभक्त कुटूंबाचे चित्रण आले आहे. मी संशोधन लिखाणासाठी शैक्षणिक दृष्टीकोन या विषय घेतला आहे.

"दलित स्त्री आत्मकथनात 'जीणं आमुचं' या आत्मकथनाचे महत्व अनेक अंगाने विषद करता येऊ शकते. केवळ आत्मकथनच नाही तर धर्मांतरापूर्वी च्या महार समाजाचे ते समाजचित्रण आहे. अन्य कुठल्याही दलित स्त्रीच्या आत्मकथनात महारवाडयाचे इतके बारकाईने, तिथल्या रूढी प्रथांचे व एकूण तिथल्या रोजनिशी जगण्याचे चित्रण आले आहे. यामध्ये दलित स्त्रीच्या अत्यंत हीन-दीन भोगवटयाचे सारेच चित्रण अंगावर येते."[3]

पुरंदर तालुकयातील आजोळ च्या गावी बेबी कांबळे यांचा जन्म झाला. त्यांनी आपल्या लहानपणीची मृत्यूची हकीकत, खेळकरपणे त्या वेळची परिस्थिती मांडतात. मुलगी मेली समजून महारवाड्यात तिला पुरण्याची तयारी सुरू असते, पण आई स्वत:च्या मुलीला सोडत नाही. रात्रभर मुलीला मांडीवर घेऊन बसते आणि पहाटे ती मुलगी जिवंत होते. त्या काळातील सामाजिक वास्तव चित्रण या आत्मकथनात आले आहे. समाजात देव भोळेपणा होता. रूढी-प्रथाचे पालन करणे हाच जगण्याचा मार्ग होता. जीवन जगण्यासाठी माणसे कोणतेही कामे करायचे. असे विदारक चित्र समाजात होते.

त्या कालखंडात ही पशुसारखे जीवन जगणारी माणसे होती. पिढयान पिढया एकच काम करणे हा दंडक होता. पोतराजाच्या मुलान पोतराजच व्हाव अशी ही व्यावस्था होती. कधी-कधी त्याच्या मनामध्ये पण विचार यायचा आपला मुलगा हुशार आहे, पण आपण ही व्यावस्था झिडकारून शकत नाही. असे वाटत असते.

बेबी कांबळे याच्या आजोळी सोळा घरांचा महारवाडा होता. त्याचे घर सुशिक्षित होते. त्याचे आजोबा ब्रिटिश अधिकाऱ्याकडे कामाला होते. घरात शिक्षणाचा वारसा होता. तिथूनच बेबी कांबळे यांना शिक्षणाचा वारसा लाभला होता. शिक्षणाने चांगली प्रगती होत असते. असा नमुनाच त्याच्या गावात होता. लेखिकेचे वडील, सरकारी छोटे–मोठे कामाचे कंत्राट घ्यायचे. यामधूनच त्याचे घरदार चालायचे. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची 1930 मध्ये जेजुरी येथे सभा होती. जत्रांच्या निमिताने लोक गोळा व्हायचे त्या जत्रेला परिसरातील महार समाज पायी चालत येत असे. लोकांमध्ये संवादाची भाषा प्रंसगानुसार जाणवते

"आवं पावनं, आज चावडीत सबा है म्हण

बोबाटा उठलायं." आवं व्हंय व्हंय, इरकर पावनं, तो सासवंडचा रणपिसे पावनां सागत व्हता.

लाबनं सात समुद्राच्या पल्याडनं शिकून आलाय म्हणं आपल्यातला पोरगां. लय लय बगा शाळा शिकंलाय गोऱ्या साहेबासंग गॉट मॅट करतू म्हणं,"[4]

अशा प्रकारे एकमेकांमध्ये संवाद करतानाचा प्रसंग आलेला आहे. सर्व लोकाच्या मनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपणाला मोलाचे मार्गदर्शन करतील अशी उत्सुकता लागलेली असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभेला उद्देशून सागतात.

"देवभोळेपणात जसा बायकांचा सिंहाचा वाटा आहे. तसाचा आपली मुलं सुशिक्षित करण्याचा पहिला मान त्या पटकावतील, हा माझा आत्मविश्वास आहे. तुमचं पुढचं पाऊल हे राहील की, स्त्रिया आपली मुलं शिकवून शहाणी करतील, ह्या सगळया अज्ञान पालनाच्या रूढी फेकून ह्या माझ्या भोळया भाभड्या बाधवांनो, पोटच्या आगीकरता निच कामे करण्याचं सोडूनं द्या, गावची घाण काढण्याचं टाकून द्या, इतके दिवस आपण काढला. आता इथून पूढे जा घाण करतो, त्यालाच ती काढण्याची सवय लागू द्या ही आपल्यावर लादलेली गुलामगिरी सहजासहजी जाणार नाही. त्याकरिता आपणाला क्रांती केली पाहिजे. पाऊण

पिढीचा नायनाट झाला तरी चालेल. पण पाव पिढीतर मानाने माणूस म्हणून जगेल आणि पुढचं भवितव्य उज्जवेल बनेल. माझ्या आया बहीणींनो, सुधारणेच पहिला पाऊल तुमचं पडू द्यां”5

उपरोक्त प्रसंगान्वये त्याकाळी समाजात परिवर्तनाची लाटा सुरू झाली. प्रत्येकजण बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन जगू लागला गावातील निच काम करण्यास नकार देऊ लागला बाबासाहेबांनी इतका मोठा विश्वास स्त्रियांवर दाखविला. त्यामुळे प्रत्येक स्त्रिला वाटू लागले की, मी माझ्या लेकरांना शिकवणार, मोठ करणार आणि ही गावकीची कामे करून देणार नाही अशा पद्धतीने लोक वागू लागली.

बेबी कांबळे आपल्या आत्मकथनात सांगतात की, माझ्या वडीलांनी माझं नाव शाळेत टाकल आणि माझ्या वडीलांच्या मित्रांनी पण आपआपली मुलं शाळेत घातली दहा ते बारा पोरी शाळेत जाऊ लागली. चावडीवर शाळा भरायची लेखीकेचे वडील वर्तमानात आलेली बाबासाहेबाची बातमी सर्वांना वाचून दाखववायचे घरपरिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाच विषय असायचा. नंतरच्या कालखंडात महारवाडयातील मुली चौथीच्या इंग्रजी शाळेत ‘मुधोजी हायस्कुलमध्ये जाण्याचा तीस चाळीस मुलीचा गट सुरू झाला. इंग्रजी शाळेत जाणारा पहिला मुलगा हा लेखीकेचा चुलता होता. अशा पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रेरणेने शिक्षणाचा प्रवाह वाढू लागला तेव्हा डॉ. भडकमकट याच्या प्रयत्नाने हरिजन बोर्डींग सुरू झाले. त्या ठिकाणी मुलं राहू लागली.

त्याकाळात शिक्षक परिस्थितीनुसार महार मुलांचा विटाळ कारायचे, कन्या शाळेत शिकत असताना शिक्षिका अपमानीत शब्द बोलायची, रूळ फेकून मारायची असा प्रसंग बेबी कांबळे आत्मकथनात मांडतात. त्या वेळची परिस्थिती वास्तव आहे. किती वेदना सहन कराव्या लागायच्या याची जाणीव होते.

हिंदु धर्मातील मुली व दलित मुली याच्यात समाज व्यवस्थेमुळे सतत मारामारी व्हायची, एकमेकीना शिव्या-द्यायच्या, त्यांना घरी गेल्यानंतर आंघोळ करावी लागत असत. पुन्हा त्यांना घरात घेतलं जायचं नंतर रामाच्या मंदिरात जाऊन पुजा करावी लागत असत. या मुली “अग मला तर घरी गेल्यावर आंघोळ करावी लागते. आमच्या आईला महाराच्या मुली वर्गात आहेत कळल्यापासुन, आई मला आघोंळ केल्याशिवाय घरातच घेत नाही. अंग आम्हाला सारखंच रामाच्या देवळात जावं यावं लागतं आता काय करायचं? आपण कुठं पाणी पिणार म्हणून चिडून आमच्या अंगावर दगड माती टाकायच्या डोळयात आणि खऱ्या त्वेषाणे त्याची दाणादाण करून टाकायचो”6

असा प्रसंग या आत्मकथनात आला आहे यात असे जानवते दलित समाजात स्व ची जाणीव जागृत झाली होती. यातूनच प्रत्येकजण आपल्या मुलांना शाळेत पाठवतात, पण इकडे मुलांना शाळेमध्ये विविधप प्रसंगाना सामोरे जावे लागते. एकमेकींना जिवाच्या आकांताने भांडणे करावी लागतात. हा प्रसंगातून शिक्षण घेण्याची मनातील उर्मी जाणवते.

बेबी कांबळे या आत्मकथानात मुलांच्या बालवयातील प्रसंग वर्णन करतात. सर्व सवर्ण समाजातील लोक दलितांना तुच्छ लेखत असत. पण डॉ. बाबासाहेबांमुळे सवर्ण समाजातील लोकसमोर बोलण्यास धजावत नसत. असे बोलके वास्तव चित्रण आले आहे. दलित सवर्ण मुला-मुलीच्या मध्ये गांधी – आंबेडकर याच्या संदर्भात झालेला संवाद आत्मकथनात आलेला आहे. महारवाडयातील संस्कृती कशी हळूहळू बदलू लागली याचे पदोपदी दर्शन ‘जीणं आमुचं’ या कलाकृतीमध्ये आले आहे.

सामाजिक व सांस्कृतीक जीवनात अमुलाग्र असे परिवर्तन झाले. सर्व दलित समाजात शैक्षणिक दृष्टीकोन बदलला असे वाटते. प्राचीन काळापासून चालत आलेली प्रथा परंपरा नाकारण्याचं धाडस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आहे. सामाजिक निच कामे कुणीही करत नव्हते. शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही. अशी माणसिकता तयार झाली होती. प्रत्येक व्यक्ती आपल्या मुलाला शाळेत घालत होता. एकदंरीत त्या काळी तिस ते चाळीस मुल शाळेत जात होती. ही खुपच अभिमानाची गोष्ट होती. असे बेबी कांबळे यांनी समाजातील सर्व लोकांचा शिक्षणा विषयी भावना अत्यंत खेळकरपणे आत्मकथनात चित्रित केली आहे.

**समारोप :**

दलित स्त्री आत्मकथनात ‘जीणं आमुच’ या आत्मकथनाचे महत्व विशेष अंगाने विषद करता येते. बेबी कांबळे यांनी या आत्मकथनात शैक्षणिक दृष्टिकोन सागत असताना, महार समाजाचे अतिशय बारकाईने चित्रण केले आहे. त्यामध्ये तिथल्या रूढी प्रथांचे व एकूण तिथल्या दररोजच्या जगण्याचे चित्रण आले आहे. दलित समाजाचे वास्तव चित्रणात त्याच्यावर लादलेली अस्पृशता, गावगाडयाची उठाठेव, प्रत्येक क्षणाला भुकेसाठी करावा लागणारा संघर्ष आणि त्यातही प्राणापलीकडे हिंदु धर्माचे पालन करणारा अशिक्षित महार यांचे अत्यंत वास्तवदर्शी लेखन बेबीताईनी केले आहे.

जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जेजुरी या ठिकाणी सभा होती. त्या क्षणापासून दलित समाजात नवचैतन्य निर्माण झाले. प्रत्येक जन झपाटलेल्या सारखा शिक्षणाचा विचार करू लागला समाजात नव जागृतीचा काळा सुरू झाला त्या काळामध्ये गावातील तीन ते चाळीस मुल शिकू लागली. समाजातील हीन दर्जाची कामे कोणी ही करत नसत. जो कोणी काम करेल, त्याला समाजातून बाजूला टाकला जाईल अशी परिस्थिती तयार झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंधकारमय जीवन जगणारा समाज सत्य असत्य, देव, धर्म या भावना समजू लागला मुले शिकली तर समाजात नवक्रांती होईल असा दृढ विश्वास समाजात रूढ होऊ लागला

'जीणं आमुचं' या आत्मकथनात बेबी ताईनी अनेक प्रसंगाच्या माध्यमातून शाळेतील प्रसंग खेळकरपणे मांडला आहे. सवर्ण मुली व दलित मुली यांच्यात कशा प्रकारे गांधी – आंबेडकर यांच्या वरून भांडणे होत. ही सर्व परिस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभेमूळे झाली. संपूर्ण समाजात शैक्षणिक क्रांतीचे बदल सुरू झाले. समाजातील स्त्री-पुरूषांच्या यांच्या संपूर्णपणे शैक्षणीक दृष्टीकोनात बदल झाला. बेबीताईनी आपल्या आत्मकथनात महारी बोली भाषेचा वापर परखडपणे केलेला असतो. त्या काळातील चित्रण वास्तवपणे मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामूळे शैक्षणिक क्रांती झाली. याची सर्व माहिती 'जीणं आमचं' या आत्मकथनातून दिसून येते.

**निष्कर्ष :**

1) 'जीणं आमुचं' या आत्मथनातून समाजात शैक्षणिक दृष्टीकोण जागृत झाला.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक उद्देश साध्य केला.
3) स्त्री शिक्षण हे समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका आहे, याची जाणीव झाली.
4) शिक्षाणामधून स्त्री व पुरुषांच्या मनामध्ये स्व ची जाणीव झाली.
5) मनुवादी विचारसरणीला लोक विरोध करू लागले. धार्मीक आचरणामध्ये बदल झाला.

**संदर्भ सूची :**

1) कुंभार प्रकाश, दलित साहित्य चर्चा निर्मीती, विचारमंच कोल्हापूर, 2006. पृ.6
2) सिरसाठ शिवदास, दलित आत्मकथन स्वरूप – संकल्पना व सौदर्य, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, पृ . आ.2011 पृ.21
3) गरुड शामल, दलित स्त्री आत्मकथन, यशश्री प्रकाशन, 2010 पृ.18
4) कांबळे बेबी, जीणं आमुचं, सुगावा प्रकाशन 2008 पृ. 52
5) तत्रैव पृ.53
6) तत्रैव पृ.86